# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in

(महसूल शाखा)


क्र.सीएसएलआर/मशा/सॉल्ट पॅन/भू.क्र.८(पै.)/विक्रीकर भवन/२०२०
दिनांक २८/१०/२०२०

प्रति,
१) मा.अपर मुख्य सचिव
वित्त विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

व मिळकत
२) उप भूमी व्यवस्थापक,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.),
मुंबई - ४०००५१.

विषय :- जमीन : मुंबई शहर
नविन विक्रीकर भवन बांधण्यासाठी वडाळा सॉल्ट पॅन येथील भू.क्र.८ मधील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नावे असलेल्या २१९९.९० चौ.मी. क्षेत्रफळापैकी २१७१.५८ चौ.मी. इतक्या जागेच्या मालमत्ता पत्रकावर वित्त विभागाचे नाव लावणेबाबत तसेच सदर जागेचा ताबा वस्तू व सेवा कर विभागास देणेबाबत

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र.जमीन-२५१८/प्र.क्र.१००/ ज-२ दि.२१/१०/२०२०
२) राज्यकर सहआयुक्त(मुख्या-४) यांचेकडील पत्र क्र.राउआ (ज.स./आ[illegible]/ प्रस्तावित वडाळा इमारत/२०२०-२१/ब-९५६ दि.२३/१०/२०२०

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भीय क्र.१ नुसार वडाळा सॉल्ट पॅन महसूल विभागातील भूकर क्र.८ मधील एकूण शासकीय जमीनीपैकी जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाच्या दि.२१.०४.२०२० रोजीच्या मोजणी नकाशातील 'अ' व 'ब' प्रमाणे चिन्हांकीत केलेल्या २१९९.९० चौ.मी. क्षेत्रापैकी मोनोरेल्वेच्या सब स्टेशनची २८.३२ चौ.मी. एवढे क्षेत्र वगळून २१७१.५८ चौ.मी. इतकी जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २९५ मधील तरतूदीन्वये वित्त विभागास महसूल मुक्त व भोगवटारहित तत्वावर ३० वर्षाकरीता नियमीतरित्या भाडेपट्ट्याने मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

27/10/2020
MMRDA

तरी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून वित्त विभागास वडाळा सॉल्ट पॅन महसूल विभागातील क्र.८ मधील एकूण शासकीय जमीनीपैकी या कार्यालयाच्या दि.२१.०४.२०१५ रोजीच्या मोजणी नकाशातील 'अ' व 'ब' प्रमाणे चिन्हांकीत केलेल्या २१९९.९० चौ.मी. क्षेत्रापैकी मोनो रेल्वेच्या सब स्टेशनची २८.३२ चौ.मी. एवढे क्षेत्र वगळून २१७१.५८ चौ.मी. इतकी जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २९५ मधील तरतूदीन्वये वित्त विभागास महसूल मुक्त व भोगवटारहित तत्वावर ३० वर्षाकरीता नियमीतरित्या भाडेपट्ट्याने देण्याबाबत व नविन वस्तू व सेवा कर भवन व इ.कार्यालये बांधणेकरीता ताब्यात देणेस परवानगी देणेत येत आहे.

अटी व शर्ती :-

१) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ५ मधील तत्वानुसार तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलएनडी-१०७१/१८३७३६-ए दोन. दि.०९/०९/१९७१ मधील तरतूदीनुसार महसूलमुक्त व भोगवटा मुल्यरहीत तत्वावर विषयाधील जमीन मंजर करणेत येत आहे.

२) भाडेपट्ट्याचा कालावधी जमिनीचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून ३० वर्षे इतका असेल व त्याच तत्वावर नुतनीकरणास पात्र असेल.

३) अंतिमत: मंजूर करण्यात आलेल्या या जमीनीचा नियोजीत वापर वित्त विभागाने पुढील ३ वर्षामध्ये सुरू करणे आवश्यक राहील.

४) सदर जमिनीचा मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापर करणे, बीओटी/ बीओओटी/पीपीपी वा अन्य प्रकारे खाजगी सहाभागातून सदर जमिनीचा विकास करणे,तो पोटभाडयाने देणे इत्यादी कार्यवाही करावयाची असल्यास त्यास महसूल व वन विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच त्यासाठी निश्चित करण्यात येईल इतके अधिमुल्य/अनर्जित रक्कम या विभागास अदा करणे आवश्यक राहील.

५) भविष्यात वित्त विभागाने उक्त जमिनीचा मंजूर प्रयोजनाकरीता वापर करणे थांबविल्यास अथवा जमीन मंजूर करण्याच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास व सदर बाब वित्त विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यावरही विहीत केलेल्या कालावधीत सदरहू शर्तभंग निराकरणाबाबत उचित कार्यवाही न केल्यास सदरहू जमीन त्यावरील बांधकामासह परत घेण्याचा अधिकार राज्य शासनाच्या महसूल व वन विभागास असेल.

६) विक्रीकर आयुक्तालयाच्या नियोजीत संकुलातील सभागृह व इतर अनुषंगिक सुविधांचा आवश्यकतेनुसार विनामुल्य वापर करण्याचा महसूल विभागास पूर्णपणे अधिकार असेल.

७) विषयाधीन जमिनीचे आरक्षण ,सी.आर.झेड. तसेच संरक्षीत वने इत्यादींबाबत आवश्यक परवानगी संबंधीत सक्षम प्राधिकरणाकडून घेण्यात यावी.

८) सदर जमिनीच्या संरक्षणाची सर्वस्वी जबाबदारी विक्रीकर आयुक्तालयाची असेल.

९) उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रू.५००/- च्या मुद्रांक पेपर वरील हमीपत्र सादर करावे.

उक्त विषयांकीत प्रकरणी विभागास वडाळा सॉल्ट पॅन महसूल विभागातील क्र.८ मधील २१७१.५८ चौ.मी. इतक्या जमिनीचा ताबा घेणेकरीता वित्त विभागाचे प्रतिनीधी व उप भूमी व्यवस्थापक यांनी अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी दि. २७/१०/२०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वा. विषयांकीत स्थळी हजर राहून ताबा देण्याची व घेण्याची कार्यवाही करावी.

(राजीव निवतकर)
जिल्हाधिकारी,मुंबई शहर

प्रत :- १) राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४), राज्यकर उपायुक्त (ज.सं.) यांचे कार्यालय, ई विंग, पहिला मजला, वस्तू व सेवा कर विभाग, माझगाव, मुंबई – ४०००१०.

२/- उपरोक्त नमुद दिवशी व वेळी जागेवर आपण अथवा आपले प्राधिकृत प्रतिनीधी यांनी उपस्थित राहून विषयांकीत जागेचा ताबा घेणेची कार्यवाही करावी.

Received
27/10/2020
(Unmesh Jadhav)
Asst Commr GST (P&E)

२) सहायक अधिक्षक क्र.२, मुंबई नगर भूमापन व भूमी अभिलेख शहर

२/- विषयाधील भूखंडाचा ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून घेऊन वित्त विभागास उपरोक्त दिनांकास हस्तांतरीत करणेची कार्यवाही समक्ष जागेवर हजर राहून करणेबाबत संबंधीत परिरक्षण भूमापक यांना सुचना देण्यात याव्यात. तसेच जागा हस्तांतरीत अभिलेख्यात व मिळकतपत्रिकेवर नोंद घेण्यात यावी.

(राजीव निवतकर)
जिल्हाधिकारी,मुंबई शहर